# 100 दिवस कृती आराखडा

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | संकेतस्थळ |
| २ | केंद्र शासनाशी सुसंवाद |
| ३ | स्वच्छता |
| ४ | तक्रार निवारण |
| ५ | कार्यालयीन सोई सुविधा |
| ६ | कामकाजातील सुधारणा |
| ७ | अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण सेवा विषयक न्यायालयीन बाबी आणि कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानचा वापर (AI) |
| ८ | आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन |
| ९ | नाविन्यपूर्ण उपक्रम-१ सुकर जीवनमान |
| १० | नाविन्यपूर्ण उपक्रम २ कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा |

# १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत

क्षेत्रिय शासकीय व निमशासकीय कार्यालयासाठी १०० दिवसांच्या कृती आराखडा या विषयावर मा.मुख्यमंत्री यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालीका आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधिक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना १०० दिवसांमध्ये पुढील मुद्दयांवर कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

- **संकेतस्थळ** ( Websitie)
- **सुकर जीवनमान** ( Ease of Living)
- **स्वच्छता** (Cleanliness)
- **जनतेच्या तक्रारीचे निवारण** (Grievance Redressal)
- **कार्यालयातील सोयी व सुविधा** (Amenities at work place)
- **गुंतवणूकीस प्रोत्साहन** (Investment Promotion)
- **क्षेत्रिय कार्यालयांना भेटी** (Field Visit)

उपरोक्त पार्श्वभुमीवर, राज्यातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयानी १०० दिवसांमध्ये कृती आराखडयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. सदर कृती आराखडयाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या बाबतीत संबंधीत विभागीय आयुक्त हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. सदर १०० दिवसांचा कृती आराखडा दिनांक १५ एप्रिल २०२५ पर्यंत यशस्वीपणे राबवून त्याचा अहवाल दिनांक १८ एप्रिल २०२५ पर्यंत वरिष्ठांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

# प्रस्तावना

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय ही महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाची प्रशासकीय यंत्रणा असून तिचा उद्देश कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ या कायद्यांची अंमलबजावणी करणे व कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याणाची खात्री करणे होय. वाढत्या कारखानदारी सोबतच वेळोवेळी कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये दुरुस्ती करण्यात येते. या विभागास;

(अ) धोकादायक रसायनांचे उत्पादन साठवण व आयात नियम, १९८९,

(ब) रासायनिक अपघात (आपत्कालीन नियोजन, सुसज्जता व प्रतिसाद) नियम, १९९६ व

(क) महाराष्ट्र कारखाने (अतिधोकादायक कारखान्यांचे नियंत्रण) नियम, २००३ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारीसुध्दा देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य हे देशातील औद्योगिकदृष्टया सर्वात अधिक प्रगत राज्य आहे. त्यामध्ये ३९,६६९ नोंदणीकृत कारखाने असून त्यातील कामगारांची संख्या अंदाजे ३२,९०,८८० इतकी आहे. कापड, रासायनिक, अभियांत्रिकी, औषधी, खत, जंतुनाश पेट्रोकेमिकल्स, सिमेंट, कागद अशा मोठया उद्योग समुहाचाही यामध्ये समावेश आहे. या कारखान्यांमध्ये उत्पादनात अनेक प्रकारच्या गुंतागुंतीच्या प्रक्रिया चालतात. ज्या लहान कारखान्यात धोकादायक, विषारी ज्वालाग्रही रसायने वापरली जातात त्या लहान उद्योगांना शासनाने अधिसुचना काढून कारखाने अधिनियम लागू केले आहेत. अशा सर्व प्रकारच्या कारखान्यातील कामगारांच्या प्रामुख्याने सुरक्षितता व आरोग्यविषयी अंमलबजावणीची जबाबदारी या संचालनालयावर सोपविण्यात आली आहे.

# संकेतस्थळ




कार्यालयामार्फत www.mahadish.in हे नविन संकेतस्थळ (website) विकसित करण्यास शासनाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली असून संकेतस्थळाचे कामकाज मे.महाआयटी या शासकीय कंपनीस दिले आहे.

(अ) वापरण्यात सुलभता (User Friendly):-

या संचालनालयाच्या www.mahadish.in या संकेतस्थळावर खालील सेवा देण्यात येतात.

- LMS (lms.mahaonline.gov.in)
- CIS (central inspection system)
- Software Modules (अपघात अहवाल प्रणाली, सक्षम व्यक्ती व सुरक्षा लेखा परिक्षक)
- MAITRI (maitri.mahaonline.gov.in)
- RTS

या सेवा वेबसाईटद्वारे सहजपणे उपलब्ध होत असून त्यामधून navigate करता येतात.

(आ) माहिती अद्ययावतीकरण (Updated Information) :-

Data Security", "GIGW" च्या मार्गदर्शक त्तवाप्रमाणे **सर्व माहिती अद्यावत करण्यात आली आहे.**

(इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण (Proactive disclosure under RTI Act):-

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, अंतर्गत कलम ४ नुसार **१७ बाबींची** माहिती **माहे डिसेंबर २०२४** पर्यंत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर **अद्यावत करण्यात आलेली आहे**.

(ई) सुरक्षितता (Data/Cyber Security) :-

"Data Security", "GIGW" च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सर्व माहिती सुरक्षित ठेवण्यात येते.

(उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिद्ध करणे:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदीनुसार या संचालनालयाच्या ६ सेवांबातची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# केंद्र शासनाशी सुसंवाद

(अ) **राज्याच्या विकासाशी संबंधीत केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव व विधेयकाचा पाठपुरावा करून पूर्तता करणे** :- राज्याच्या विकासाशी संबंधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खालील बाबींबाबत पाठपुरावा करून पूर्तता करण्यात येते.

१. उद्योग सुलभीकरणाकरीता EODB अंतर्गत या संचालनालयाने केलेल्या महत्वाच्या सुधारणा :-

- **दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ पासून कारखान्यांना परवाना देणे, परवाना नूतनीकरण व नकाशे मंजुर करणे करीता ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे.**
- **महिला कामगारांना रात्रपाळीत काम करण्यासाठी काही ठराविक अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली.**

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ :-

कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ अंतर्गत;

- नोंदणी करणे,
- परवाना देणे
- परवाना नूतनीकरण करणे.
- नकाशे मंजूर करणे.

३. BRAP:-

केंद्र सरकारच्या BRAP-२०१४ प्रणालीमार्फत वेळोवेळी येणाऱ्या सूचना, निर्णय तसेच सुधारणा यांचेसंबंधित बाबींचा विचार करून योग्य तो निर्णय घेतला जातो.

उदा. BRAP चे Reform १४ आणि २० च्या अनुषंगाने LMS द्वारे सेवा पुरविताना पॅन नंबर सिंगल Business ID म्हणून घेण्याचे अवलंब केला आहे.

४. De-regulation by Central Govt:-

केंद्र सरकारच्या मार्फत De-regulation समिती कडून आलेल्या सूचनांचा प्रस्तावाकरीता या संचालनलायाकडून कार्या.आदेश क्र.९६, दि.०९/१०/२०२४ अन्वये समिती स्थापित करून OSH Code २०२० सोबत De-regulation चे समितीचे कार्य चालू आहे. याबाबत मंत्रालयीन बैठका घेऊन लवकरात लवकर De-regulation या विषयावर निर्णय घेण्यात येईल.

५. OSH Code-२०२०:

केंद्र सरकारने दि. २७/०९/२०२० OSH Code पारित केल्यापासून ह्या चालनालयाकडून OSH Code २०२० करिता कार्या.आदेश क्र.९६, दि.०९/१०/२०२४ अन्वये समिती गठित करून OSH नियम वेळोवेळी अद्यावत करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. OSH नियमावर सुधारणा मंत्रालय पातळीवर सुरू आहेत.

(आ) **राज्याचाही केंद्रीय योजनांना दिलेला लक्षांक पूर्ण करणे** :- EODB & BRAP उपक्रमांतर्गत संचालनालयाने सेवा पुरविण्यासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिलेला आहे. EODB अंतर्गत येणा-या तक्रारी या संचालनायामार्फत विहित नियमानुसार निकारण करण्यात येते. **सद्यस्थितीत कोणतीही तक्रार प्रलंबित नाही.**

**(इ) केंद्रीय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्राप्त करुन घेणे, तसेच राज्याचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरित करुन घेणे** :- लागू नाही

**(ई) केंद्र शासनाच्या विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रावर वेळीच कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे** :- EODB & BRAP उपक्रमांतर्गत संचालनालयास प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळोवेळी कार्यवाही करून सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात येतो. **सद्यस्थितीत कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही.**

# स्वच्छता

(अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण :-

अभिलेखांची निंदणीचे कामकाज व वर्गीकरणाचे कामकाज अ ब क ड वर्गीकरण नुसार करण्यात आले.

| **निंदणीकरण पूर्वीचा** | **निंदणीकरण नंतरचा** |
|---|---|
| २५ मार्च २०२५ | ३० मार्च २०२५ |
|  |  |

(आ) मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे :-

मुदतबाहय अभिलेखे नष्ट करण्याचे कामकाज शासन परिपत्रक क्र.FDE-३२६३/९६११०/LAB-III, DT.५/५/१९६३ नुसार **अ ब क ड** वर्गीकरण करण्यात आले.

(इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण :-

जड वस्तू संग्रह नोंदवही **माहे डिसेंबर २०२४ पर्यंत अद्ययावत** करण्यात आलेली आहे.

(ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट :-

कार्यालयातील जुने फर्निचर, कॉम्प्युटर, टेबल, फॅन इत्यादींचे र्निलेखन वेळच्या वेळी करण्यात येते. संचालनालयाच्या ५ व्या मजल्यावर स्थित असलेल्या कार्यालयाचे नूतीनकरण २०२४ -२०२५ मध्ये करण्यात आलेले आसून, ६व्या मजल्यावर स्थित असलेल्या कार्यालयाचे नूतनीकरण २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात करण्याचे नियोजित आहे. तसेच जड वस्तु संग्रह नोंदवहित नोंद घेण्यात आलेला आहे.

(उ) जुन्या वाहनाचे निर्लेखन :-


कार्यालयांच्या आवारात असणारी जुनी व वापरात नसलेली वाहने यांचे विहित पध्दतीने निर्लेखन करण्यात आलेले आहे.

# तक्रार निवारण

(अ) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण (दि. १ एप्रिल, २०२५ पर्यंत तक्रारी निरंक करणे) (टक्केवारीत %) :- १ एप्रिल,२०२५ पर्यंत आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे **१०० टक्के** निराकरण करण्यात आलेले आहे.

(आ) पी.जी. पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण (दि. १ एप्रिल, २०२५ पर्यंत तक्रारी निरंक करणे) (टक्केवारीत %):- १ एप्रिल,२०२५ पर्यंत पी.जी. पोर्टलवरील तक्रारींचे **१०० टक्के** निराकरण करण्यात आलेले आहे.

(इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व प्रसिध्दी फलक :-
सर्व अधिका-यांच्या भेटीच्या करीता दैनंदिन वेळा आठवडयातील राखून ठेवण्यात आलेले आहे व तसे दर्शनी भागात लावण्यात आलेले आहे.



अधिकाऱ्यांचे उपस्थितीचे दिवस व वेळ

| अ. क्र. | नाव व पदनाम | कार्यालयीन उपस्थितीचे दिवस | अभ्यागतांना भेटण्याची वेळ |
|---|---|---|---|
| १ | श्री. रा. दि. दहिफळे, अपर संचालक | सोमवार ते शुक्रवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| २ | श्री. सु. अ. शिंदे, सह संचालक | सोमवार ते शुक्रवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ३ | श्री. क. श्री. कुलकर्णी, उप संचालक | सोमवार व गुरूवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ४ | श्री. स्व उ. पुपुलवाड, सहाय्यक संचालक | बुधवार व शुक्रवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ५ | श्रीमती स्ने. सं. कुकटोळे (पाटील), सहाय्यक संचालक | मंगळवार व गुरूवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ६ | श्री. यो. गो. कोवे, उप संचालक | मंगळवार व बुधवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ७ | श्री. वै. ब. जांबले, सहाय्यक संचालक | सोमवार व शुक्रवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ८ | श्रीमती अ. वि. ननवरे, सहाय्यक संचालक | मंगळवार व गुरूवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| ९ | श्री. नि. आ. गजपूरे, उप संचालक | बुधवार व शुक्रवार | सायं. ३ ते सायं. ५ |
| १० | श्री. ओंकार मेंगाळ, सहाय्यक संचालक | मंगळवार व गुरूवार | सायं. ३ ते सायं. ५ |

(ई) लोकशाही दिनामधील तक्रारीचे निराकरण :- लोकशाही दिनामधील तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

# कार्यालयीन सोई सुविधा

(अ) कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :

कार्यालयांमधील अधिकारी / कर्मचारी वर्ग तसेच येणारे अभ्यांगत यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची योग्य व स्वच्छ (५व्या व ६व्या मजल्याकरीता ॲक्वागार्ड द्वारे गरम/थंड/साधे पाणी) अशी कायमस्वरुपी व्यवस्था केलेली आहे.



(आ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा :-

मुख्यालय / ठाणे /वसई / सातारा या कार्यालयांचे अद्यावत नूतनीकरण करण्यात आलेले आहे. कर्मचारी आणि अभ्यांगत यांच्यासाठी कार्यालय व कार्यालयाच्या आवारातील प्रसाधनगृहे दर दिवशी स्वच्छ ठेवण्यात येतात.

(इ) महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा :

संचालनालयाच्या ५ व्या मजल्यावरील महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाच्या नूतनीकरणाचे कामकाज पूर्ण झालेले आहे. सदर प्रसाधनगृहे दर दिवशी स्वच्छ ठेवण्यात येतात. सद्य:स्थितीत ६व्या मजल्याचे महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वचछता गृहाचे नूतनीकरणाचे कामकाज सुरु आहे.

(उ) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था :-



कार्यालयामंध्ये येणाऱ्या अभ्यांगतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय आहे

(ऊ) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौदर्यीकरण :-कार्यालयामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांचे नामफलक लावण्यात आलेले असुन ते अद्यावत केले आहे.

# कामकाजातील सुधारणा

(अ) कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी याचे ई-ऑफिस प्रणाली वापरण्याचे प्रमाण :-

कार्यालयातील सर्व कामकाज मार्च-२०२३ पासून १. LMS, २. CIS, ३. Mahadish website, ४. Sevarth या प्रणालींद्वारे कार्यान्वित करण्यात येतात.

(आ) ऑफिस प्रणालीतील ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे :-

ऑफिस प्रणालीतील ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करण्यात येतो.

(इ) ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी (%):-

| १.१.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत प्राप्त झालेल्या व निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांचे विवरणपत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| **अनु.क्र.** | **पुरविण्यात येणा-या सेवेचे नाव** | **एकूण प्राप्त अर्ज** | **निकाली काढलेले अर्ज** | **निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी** |
| १ | परवाना नोंदणी व परवाना देणे | २४२८ | २३९२ | ९८.५०% |
| २ | परवाना नुतनीकरण | ५७७५ | ५५९४ | ९६.८०% |
| ३ | नकाशे मंजुरी | ४३२९ | ४२६३ | ९८.४०% |
| ४ | परवान्यात दुरुस्ती करणे | ९०५ | ८८४ | ९७.६०% |

(ई) वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण / खुलासा वेळीच प्रसिध्द करणे :-

- असल्यास वेळच्या वेळी कार्यवाही करण्यात येते व सदरचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येते. सद्यस्थितीत कोणताही शासन विरोधी प्रसिद्ध होणारी बातमी बद्दलचे खुलासा/स्पष्टीकरण प्रलंबित नाही.

# अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण सेवा विषयक न्यायालयीन बाबी आणि कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानचा वापर (AI)

(अ ) नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे :-

- या संचालनालयात नव्याने सेवेत प्रविष्ट झालेल्या गट-अ व गट-ब चे एकूण ३९ अधिकारी यांनी दि.२१/०२/२०२५ ते दि. २५/०३/२०२५ या कालावधीत यशदा, पुणे येथे यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले.






- १०० दिवसाच्या कार्यक्रमाअंतर्गत IGOT वरील ५ कोर्स पूर्ण करणेबाबत :
  या संचालनालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी IGOT प्लॅटफॉर्मवर नोंदणी करून प्रणालीवर उपलब्ध कौरसेसपैकी ५ कोर्स पूर्ण करण्यात आले आहे.

(आ) सर्व अधिकारी/कर्मचारी याचे गोपनीय अहवाल लिहिणे (३१ मार्च २०२४ पर्यतचे) :-

अधिकारी व कर्मचारी यांचे माहे ३१ मार्च २०२४ पर्यंतचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. या संचालनालयातील गट-अ व  गट-ब मधील अधिका-यांच्या गोपनीय अहवालांचा महापार ऑनलाईन कार्यमूल्यमापन प्रणालीत सन २०२४-२०२५ करीता  समावेश करण्यात आलेला आहे.

(इ) सेवाज्येष्ठता याद्या प्रसिद्ध करणे व पदोनत्या करणे :-


सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दिनांक २१/०६/२०२१ “महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१” नुसार या संचालनालयातील कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०२५ रोजीची ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क.१५९/कार्यासन-१२, दिनांक ०१/०८/२०१९ नुसार  ०१ सप्टेंबर २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२५ या निवडसूची वर्षामध्ये विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेऊन अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(ई) न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे :-या संचालनालयातील मा. उच्च न्यायालयात  १४ आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात १९ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच गट-अ च्या २ अधिका-यांची आणि गट-क च्या २ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

(उ) कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे  :-

१. कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या कारखान्यांतील कामगारांची वैद्यकीय तपासणी करण्याकरीता प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रमाणक शल्य चिकित्सकांना कामगारांच्या वैद्यकीय तपासाणीची तीन छायाचित्रे (Geo-Tagging) मोडयुलवर अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांनी केलेल्या वैद्यकीय तपासणीची थेट स्थिती या संचालनालयाच्या अधिका-यांमार्फत तपासणी केली जाते.






२. एकात्मिक पोर्टल मध्ये कृत्रीम बुध्दीमता तंत्रज्ञानाचा वापर (AI) करण्याची कार्यवाही सुरू आहे. मुंबई व ठाणे कार्यालयातील अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये  AI तंत्रज्ञानाचा वापर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

(अ) गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे :-

- गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी कारखान्याला सात दिवसांत सशर्त परवाना देण्यात येतो.
- उद्योग सुलभिकरणाच्या (Ease of Doing Bussiness) अनुषंगाने गुंतवणूकदारांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंतर्गत येणा-या सर्व सेवा ऑनलाईन पोर्टलद्वारे पुरविण्यात येतात.

(आ) व्यापारी कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे :-

व्यापारी व कामगार वर्गाच्या संघटनांशी संबंधित अधिकारी यांचेशी वेळोवेळी चर्चा करून तसेच बैठका आयोजित करुन त्यांच्या अडचणी सोडविण्यास मदत करण्यात येते. या संचालनालयामार्फत अधिकारी आपआपल्या कार्यक्षेत्रात जाऊन प्रशिक्षण सराव घेतात, तसेच व्यापारी व कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. नुकताच दि.२६/०३/२०२५ रोजी आपतकालिन प्रशिक्षण सराव राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर, चेंबूर येथे घेण्यात आला. त्यामध्ये व्यापारी व कामगार वर्गाचा संघटनांशी चर्चा झाली. तसेच भारत पेट्रोलियम्स लि. व केंद्रीय श्रमिक संस्था येथे वेळोवेळी बैठकी घेण्यात येतात.






(इ) गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण करणे :-

मैत्री व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवांबाबत आलेल्या गुंतवणूकदार /उद्योजकांच्या अडचणींचे विहित नियमानुसार वेळोवेळी निराकरण करण्यात येते.

### (ई) गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करणे :-

सुलभीकरणाकरीता सर्व सेवा ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत खालील सेवा देण्यात येतात :-

| अ.क्र. | सेवांचा तपशील | दिवस |
|---|---|---|
| १ | कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ अंतर्गत नोंदणी करणे,परवाना देणे व परवाना नूतनीकरण करणे. (अतिधोकादायक/ धोकादायक कारखाने वगळून इतर कारखाने ) | ०७ |
| २ | कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत नोंदणी व परवाना देणे. (अतिधोकादायक / धोकादायक कारखाने ) | २१ |
| ३ | कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत परवाना नूतनीकरण करणे. (अतिधोकादायक / धोकादायक कारखाने ) | ६० |
| ४ | कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत कारखान्यांचे नकाशे मंजूर करणे. | २१ |
| ५ | कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत परवाना दुरुस्ती करणे. (अतिधोकादायक / धोकादायक कारखाने वगळून इतर कारखाने) | ०७ |
| ६ | कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ अंतर्गत परवाना दुरुस्ती करणे. (अतिधोकादायक /धोकादायक कारखाने ) | ६० |

# नाविन्यपूर्ण उपक्रम-१ सुकर जीवनमान

(अ) नागरिक केंद्रिय सेवांचे सुलभीकरण (किमान २ सेवा)

**(पूर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदल याची तुलना आवश्यक)**

**ऑफलाईन / ऑनलाईन:-**

**तुलनात्मक तक्ता -**

| | **ऑफलाईन सेवा** | **ऑनलाईन सेवा** |
|---|---|---|
| १ | दि. ३०.११.२०१५ पूर्वी कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत नोंदणी व परवाना देणे व परवाना नुतनीकरण ऑफलाईन पध्दतीने करण्यात येत होते. | दि. ३०.११.२०१५ पासून कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत नोंदणी व परवाना देणे व परवाना नुतनीकरण कामगार व्यवस्थापन प्रणालीमार्फत ऑनलाईन करण्यात येते. |
| २ | ऑफलाईन परवाना नोंदणी व परवाना नुतनीकरणासाठी कारखानदारास प्रत्यक्ष कार्यालयात परवाना अर्ज, आवश्यक कागदपत्रे व धनादेश घेऊन कार्यालयात यावे लागत असे. | ऑनलाईन परवाना नोंदणी व परवाना नुतनीकरणासाठी कारखानदारास प्रत्यक्ष कार्यालयात यावे लागत नाही . कारखानदार ऑनलाईन अर्ज व परवाना शुल्क भरु शकतो. |
| ४ | ऑफलाईन परवाना , परवाना नुतनीकरण झाले किंवा नाही हे कारखानदारास दूरध्वनीमार्फत अथवा परवाना पोस्टाने प्राप्त झाल्यावर कळत असे. | ऑनलाईन परवाना नोंदणी व परवाना नुतनीकरणाची सद्यस्थिती कारखानदारास ऑनलाईन त्याच्या लॉगईन द्वारे कळू शकते. तसेच परवाना मंजुर अथवा नुतनीकरण झाल्यावर परवाना प्रत डाऊनलोड करुन मिळू शकते. |
| ५. | ऑफलाईन परवाना प्रकरणांबाबतीत एखादे जुने कागदपत्र शोधावयाचे असल्यास कारखान्याच्या नस्तीमध्ये शोधावे लागत असे. | ऑनलाईन परवाना प्रकरणांमध्ये कागदपत्र शोधणे सहज शक्य होते. |
| ६. | वेळोवेळी प्राप्त झालेली परवाना प्रकरणे व निकाली काढलेली परवाना प्रकरणांची संख्या याबाबत माहिती देणे आवश्यक असते. ऑफलाईन परवाना प्रकरणांत त्यांची गणना करण्यात वेळ जात असे | ऑनलाईन मध्ये ते सहज शकय् होते |
| ७. | नकाशे मंजूरीकरीता कारखानदारास कार्यालयात यावे लागत असे तसेच नकाशे द्विप्रतीत A३ size (hard copy) मध्ये सादर करावे लागत असत. | ऑनलाईन मध्ये A४ (Soft copy ) द्वारे नकाशे सादर करण्यात येतात त्यामुळे कारखानदारास खर्च कमी होतो तसेच कार्यालयात यावे लागत नाही. |

# नाविन्यपूर्ण उपक्रम २ कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

(अ) **विभागामध्ये कार्यालयीन व्यवस्थापनात २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे :-**

- **एकात्मिक पोर्टल** – या संचालनालयाच्या एकत्रित कामकाज व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत देण्यात येणा-या सेवा, आपले सरकार पोर्टल, पी-जी पोर्टल, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे पोर्टल असे विविध पोर्टल संलग्न करून या संचालनालयाचे एकात्मिक पोर्टल तयार करण्यात येत आहे.
- **प्रशिक्षण** – कार्यालयीन कार्यक्षमतेमध्ये वाढ होण्यासाठी व संचालनालयाच्या कामकाजामध्ये एकसुत्रता राहण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाकरीता प्रशिक्षण देण्यात येईल.
- **विभागांतर्गत राबविण्यात आलेले नाविण्यपूर्ण इतर उपक्रम**–
  या संचालनालयाचे श्री.के.टी.झोपे, उप संचालक, औ.सु.व आ. यांनी ०४ मार्च २०२५ ते १०मार्च २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथे सर्वात मोठा औद्योगिक सुरक्षा जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला. या कार्यक्रमात ३० वेगवेगळ्या कंपन्या व एकूण २०,२०० व्यक्तींनी सहभाग नोंदवला. या उल्लेखनीय यशाची नोंद London Books of Records मध्ये अधिकृतपणे करण्यात आली आहे.




Sports/ Cultural Program/ Social program



धन्यवाद ...